**सत्र खटला क्र. २६९ मधील फौजदारी जामीन अर्ज**

**महाराष्ट्र शासन**
**वि.**
**विठ्ठल पांडूरंग पवार**
**(CNR NO. MHBU20-001481-2019)**

## नि.क्र. ५७ खाली आदेश
## (पारीत दिनांक १५ जुन २०२४)

**०१]** प्रस्तुतचा अर्ज, अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३८ अन्वये अटकपूर्व जामीन मिळण्याकामी दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार दिनांक ०६.०९.२०१५ रोजी दुपारी १२.१५ चे दरम्यान गजानन महाराज मंदीर जवळ डोणगाव रोड, मेहकर येथे आरोपी कृष्णा व त्याचे इतर साथीदार यांनी फिर्यादी यास कमी किमतीत २ किलो सोने रू. ५,००,०००/- मध्ये देण्याचे बहाण्याने घटनास्थळी बोलावले. आरोपी लोकांनी धारदार शस्त्र व चाकूचा धाक दाखवून फिर्यादी आणि त्याच्या मित्राला लाठीने मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम रू. ५,००,०००/- असलेली व कंपनीचे कागदपत्रे असलेली निळ्या रंगाची बॅग बळजबरीने हिसकावली. तसेच आरोपींनी फिर्यादीचा मोबाईल हिसकावून स्कॉर्पीओ कार मधून डोणगाव कडे पळून गेले. त्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाणे, मेहकर येथे फिर्याद दाखल केली.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. टी. एम. काळे यांनी युक्तिवाद केला की, या प्रकरणातील मुख्य आरोपी नंदू व कृष्णा हे आहेत. आरोपी क्र. १ ते ८ यांना याच न्यायालयाने व माननीय उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अर्जदाराचे नाव फिर्यादीत नमूद नाही. तसेच आरोपी/ अर्जदाराचा या गुन्ह्याशी संबंध असल्याचा कोणताही पुरावा अभिलेखात दाखल नाही. अर्जदाराचा या प्रकरणाशी दुरवर संबंध नाही. अर्जदार हा पुण्याला स्थायीक आहे व त्याबाबतचे दस्तऐवज अर्जासोबत जोडण्यात आले आहे. या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल केले असल्याने अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदाराविरूद्ध कोणतेही गुन्हे प्रलंबित नसून त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार

तपासात सहकार्य करण्यास तयार आहे. तसेच अर्जदार अटकपूर्व जामीन मिळाल्यास कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे.

**०४]** याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. जी. जी. पोकळे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, प्रकरण हे अत्यंत जुने असून घटना तारखेपासून अर्जदार हा फरार होता. अर्जदाराविरूद्ध प्रथम–दर्शनी पुरावा मिळून आलेला आहे. अर्जदार जामीनावर सुटल्यास तो फरार होण्याची शक्यता असल्याने अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची सरकारी वकील साहेबांनी विनंती केली.

**०५]** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद आणि केस पेपर ची पाहणी केली असता असे दिसून येते की, प्रकरण अत्यंत जुने आहे. या प्रकरणात बऱ्याच आरोपींना जामीनावर सोडण्यात आले आहे. बचाव पक्षाच्या म्हणण्यानुसार अर्जदाराचे नाव फिर्यादीत नमूद नाही. तसेच मुख्य आरोप हे आरोपी कृष्णा आणि नंदू यांच्याविरूद्ध करण्यात आलेले आहे. अर्जदाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. तो मुळचा पुणे येथील रहिवासी आहे. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. अर्जदार अटकपूर्व जामिनाच्या आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे.

**०६]** आरोपी / अर्जदार हा फरार होईल अशी अभियोग पक्षाला भीती आहे. तथापि, कठोर अटी व शर्ती लादल्यास आरोपीची हजेरी प्राप्त केली जाऊ शकते. तसेच प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाले असल्याने प्रकरणू पुढे चालवण्यास मदत होईल. म्हणून अर्जदार अटकपूर्व जामीन मिळवण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## – आ दे श –

**०१]** अटकपूर्व जामीन अर्ज (नि.क्र. ५७) मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार – **विष्णु सुखदेव चव्हाण,** याला अटक होतेवेळेस पोलीस ठाणे मेहकर येथील अपराध क्र. १७७/२०१५, कलम ३९५, १२०–ब भारतीय दंड

विधान, खालील गुन्ह्यात त्याचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर अटकपूर्व जामीनावर सोडण्यात यावे.

०३] अर्जदाराने तपासात सहकार्य करावे व तपासी अंमलदाराने चौकशी कामी बोलावल्यास त्याच्या पुढे दिलेल्या वेळेस पुरावणी दोषारोपपत्र दाखल करे पर्यंत हजर राहावे.

०४] अर्जदाराने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

०५] अर्जदाराने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2024.06.20 15:24:57 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – १५.०६.२०२४**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – २, मेहकर

दिनांक – १५.०६.२०२४